# प्रारंभिक अधिसुचना

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,**
**ब्रम्हपुरी यांचे कार्यालय.**
क्र.कलि./उविअ/भूसंपा./गो.प्र./कावि/८९६/२०१८
दिनांक:- **२०. ११. २०१८**

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अन्वये कलम ११ (१) खालील अधिसुचना.**

भु.प्र.क्रमांक- **१९**/ एलए-६५/२०१८-१९ मौजा-**चिंचोली,** तालुका- ब्रम्हपुरी, जिल्हा- चंद्रपुर, प.ह.नं. **१०**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम-३ च्या (खंड) (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण दिनांक ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश" उक्क अधिनियम" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा जास्त नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, चंद्रपुर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनाकरीता (यात यापुढे ज्याचा निर्देश "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसुचित करण्यात येते की उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

//२//

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणारे असेल तर या अनुसुचीमध्ये कारणे नमुद करावी.)

आणि ज्याअर्थी सामानिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम-४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसुचि पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर याअनुसुचीमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम-४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीने बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीचा किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम-२०१४ (यापुढे ज्यांच्या निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूचि एक

## जमीनीचे वर्णन

भू.प्र.क्रं.-**१९**/एलए-६५/२०१८-२०१९

गाव :- **चिंचोली,** तालुका-**ब्रम्हपुरी**, जिल्हा-**चंद्रपुर,** प.ह.नं. **१०**

| अ.क्र. | सर्व्हे क्र.किंवा गट क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १६५ | ०.२० |
| २ | २१७ | ०.०७ |
| ३ | २२८ | ०.२० |
| ४ | २४९ | ०.०९ |
| ५ | ५०० | ०.०२ |
| ६ | ३६८ | ०.०२ |
| ७ | ३६२ | ०.०३ |
| ८ | २७० | ०.०८ |
| ९ | ४१४ | ०.०८ |
| १० | ४२९ | ०.०३ |
| ११ | ३७१ | ०.१८ |
| १२ | १०० | ०.१३ |
| १३ | १६९ | ०.०२ |
| | एकूण | **१.१५** |

## अनुसूचि-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव :- गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प

प्रकल्पकार्याचे वर्णन :- गोसीखुर्द उजवा मुख्य कालवा वरील बी-१ शाखा कालव्याच्या वितरीका २ एल व त्यावरील लघू कालवा एल-१ व एल-२ कालव्यासाठी बांधकामा करीता

समाजाला मिळणारे लाभ आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) :- गोसीखुर्द प्रकल्पामुळे १,९०,००० हे.आर. क्षेत्रात सिंचनाचे लाभ प्राप्त होणार आहेत.

## अनुसूचि-तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापित होत नाही.

## अनुसूचि-चार

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश | :- | भुमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई व पारदर्शकतेचा हक्क अधिनिय २०१३ चे कलम-१० (क) अन्वये महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसुचना दिनांक १३ मार्च २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागु करण्यात पासुन सुट देण्यात आली आहे. |

## अनुसूचि-पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यास आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | निरंक |
| ब. | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | निरंक |
| क. | ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकीची नियमुक्ती करण्यात आली त्या अधिसुचनेचा तपशिल | निरंक |

**विशेष नोंद**:- भूसंपादीत जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी जि.चंद्रपुर यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**ठिकाण**:- ब्रम्हपुरी
**दिनांक**:- २०/११/२०१८

**उपविभागीय अधिकारी**
**तथा भुसंपादन अधिकारी,**
**ब्रम्हपुरी.**